# फ्रोझन डेथ!


लेखक

**जेम्स हॅडली चेस**

स्वैर अनुवाद

**मधुकर हुद्दार**



**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

B 271

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**फ्रोझन डेथ! : मधुकर हुद्दार**
**© सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**किंमत**
₹ २००/-

# फ्रोझन डेथ!

# १

माझं नाव ग्लीन नॅश. माझा जन्म झालेला असल्यामुळे मला माझ्या जीवनाचा इतिहास आहे, परंतु माझं भविष्य मात्र अंधारानं भरलंय. मला पुढचा मार्ग दिसत नाही. उज्ज्वल भविष्याचा प्रकाश, माझ्या नशिबात कधीच प्रकाशमान झाला नाही. काही लोक मासे पकडायला आमिष लावून गळ पाण्यात टाकतात, अन् पाच मिनिटात त्यांच्या गळ्याला मासा लागतो; परंतु मी गेले तीस वर्षे गळ टाकून भाग्योदयाचा मासा अडकेल या आशेनं जगतोय, प्रयत्न करतोय पण सफलतेचा साधा पदन्यासही कानी पडत नाही.

असतं एकेकाचं भाग्य! एखादं फूल देवासमोर ठेवलं जातं, दुसरं पुढाऱ्याच्या गळ्यातील हारात जाऊन बसतं, तिसरं प्रेयसीला दिलं जातं अन् माझ्या सारखं दुर्दैवी फूल एखाद्या प्रेताला शृंगारतं! मी त्यातलाच.

माझा जन्म एका गरीब घराण्यात झाला, असं मिस मार्गारेट, जिनं मला वाढवलं, तिनं सांगितलं. माझा जन्म न्यूयॉर्कमधील एका इस्पितळात झाला व दुसरेच दिवशी शॉर्ट सर्किट होऊन इस्पितळाला आग लागली. पळापळ सुरू झाली. ही मार्गारेट माझ्या बेडजवळ होती. तिनं मला उचललं अन् फायर ब्रिगेडच्या शिडीनं खाली रस्त्यावर आणलं! आई मात्र इतर अनेकींसोबत अग्निप्तवालेत सामावून गेली. आईचा अंत असा झाला.

माझे वडील ही बातमी कळताच, भर वेगात मित्राच्या कारनं येताना, अपघात होऊन ख्रिस्तवासी झाले. थोडक्यात काय? तर आई-वडिलांना मी पाहू शकलो नाही. या मार्गारेट स्लीमननंच माझं पालनपोषण केलं. तेव्हा ती चाळीस वर्षांची होती. मातृत्वाचा अनुभव नसतानाही तिनं मला प्रेम दिलं. मी

तीस वर्षाचा झालो तेव्हा ती सत्तरीत पोचली होती. एक दिवस झोपेतच ती मरण पावली.

मी खूप रडलो. भाग्यानं दिलेलं छत्र आकाशात उडालं. शेजारपाजाऱ्यांनी सर्व दफनविधी पार पाडले. मी मूठभर माती तिच्या शवपेटीवर टाकली अन् एक फूल वाहिलं. दर वर्षी किंवा खूप दु:खी असलो म्हणजे, अजूनही तिच्या थडग्याजवळ माथा टेकवून फुलं वाहतो. माझं मन शांत होतं.

मार्गारेटनं मला फक्त मीडिल स्कूलपर्यंत शिकवलं. नंतर मीच शाळेला सोडलं. अभ्यासात फारसं लक्ष नव्हतंच मुळी. माझा एक शाळेतला मित्र जॉन पोकर पुढे मेकॅनिक झाला अन् एका मोठ्या गॅरेजमध्ये काम करू लागला. पुढे हेच गॅरेज माझं आश्रयस्थान झालं.

जॉननं मला कारच्या दुरूस्तीचं काम तर शिकवलंच पण उत्तम ड्रायव्हिंग कसं करावं याचं शिक्षण दिलं. कुठल्याही मेकची गाडी ट्रायलवर फिरवून आणण्याचं काम मी करू लागलो. जॉनबरोबर मालक आठवड्याला दोन वेळा जेवता येईल एवढे डॉलर्स मला देऊ लागले. झोपायला गॅरेज होतं. माझे हे दिवस बरे गेले, कारण पोटात अन्न अन् डोळ्यात झोप येऊ लागली.

परंतु ही झोप जास्त दिवस टिकली नाही. जॉन गॅरेज सोडून हॉलिवुडला एका प्रख्यात नटीचा ड्रायव्हर म्हणून निघून गेला. मीपुन्हा रस्त्यावर आलो!

खिशात थोडे बहुत डॉलर्स होते. त्यामुळे मीसुद्धा न्यूयॉर्क सोडून हॉलिवुडच्या फिल्म सिटीत डेरेदाखल झालो.

फुटपाथवरून फिरणं, विंडो शॉपिंगचं नाटक वठवणं, कुठल्यातरी हॉटेलमध्ये डिश वॉशिंग करून, त्या मोबदल्यात दोन्ही वेळचं जेवण करणं अन् रात्री सिनेमागृहात बाहेरील नट-नट्यांची चित्रं पाहून झाल्यावर कुठल्याही पार्कातल्या बाकड्यावर मस्तपैकी झोप काढणं असा माझा दिनक्रम सुरू झाला. कुणीतरी गल्लीत टाकलेला एक जाड ओव्हरकोट मी उचलून आपल्या मालकीचा केला होता. त्यानं पार्कात मला ऊब मिळे. झाडाच्या फांदीपासून तुटलेल्या नि वाऱ्याबरोबर भरकटत जाणाऱ्या पाला-पाचोळ्याप्रमाणे, मी दिशाहीन असं आयुष्य जगत होतो. कुठे तरी स्थिर व्हावं असं वाटत होतं. पण कुठे? कोण देणार नोकरी? सारा जन्म उष्ट्या बशा विसळत राहायचं?

मागरिट अन् जॉन पोकर हेच माझे देव! आश्रयदाते होते. पण त्यांचीही ताटातूट झाली होती. तरीही मी निराश झालो नाही.

रस्त्यानं भटकता-भटकता, मला सावरू घेणारा कुणीतरी भेटेल, हा विश्वास माझी थरथरणारी पावलं स्थिर करील, असं वाटत होतं. अन् घडलंही तसंच!

एक दिवस रात्री असाच भटकंती करीत मी एका आलिशान हॉटेल समोर उभा होतो. पार्क केलेल्या गाड्यांचे मेक व नंबर उगीच न्याहाळत एका कोपऱ्यात उभा होतो. केवळ टाईमपास! रात्र गडद अंधाराची असली तरी, विजेचे दिवे एवढा प्रकाशझोत रस्त्यावर सोडत होते की रात्रीचा दिवस झाल्यासारखं मला वाटलं.

हॉटेलच्या नामपट्टीवर लावलेल्या निऑन लाईटचा निळसर प्रकाश, प्रवेशद्वारासमोरील संगमरवरी फरशीवर पडून परावर्तीत होत होता. अर्धवर्तुळाकार असलेली ही फरशी मेनरोडला टेकली होती.

रस्त्यावरून गाड्या बुलेटच्या वेगानं जात होत्या. मी ट्रॅफिककडे पाहत असतानाच माझं लक्ष हॉटेलच्या प्रवेशद्वाराकडे गेलं. एक मध्यम वयाचा माणूस आपल्याच धुंदीत हॉटेलातून बाहेर निघाला अन् कुणीतरी मागून ढकलल्यासारखा, लहान-सहान पायऱ्या अशा पद्धतीनं उतरला जणू त्या पायऱ्यांचं अस्तित्वच नव्हतं.

मी एकटक त्याच्याकडे पाहात उभा होतो. त्याची उंची हा फूट तर नक्कीच होती. शिवाय या मध्यम वयातही तो देखणा नि आकर्षक व्यक्तिमत्त्वाचा मला वाटला. त्यानं खूप झोकली होती, त्यामुळे त्याची पावलं झोकांड्या खात होती. त्याचं रहदारीकडे लक्ष नव्हतं.

हा जर असाच चालत रस्त्यावर गेला, तर त्याचा चेंदामेंदा होईल. मागून येणाऱ्या गाड्या त्याचे छिन्नविछिन्न अवयव चारी दिशांना उडवतील. रक्ताचं कारंजं उडून पिवळ्या गाड्या लाल होतील अन् या अशा विचारात असतानाच, फेव्हिकॉलसारखा चिकटलेला मी वेगानं पुढे झेपावलो.

तो फरसंबद सीमेच्या काठावर होता-पुढे पाऊल टाकणार एवढ्यात मी धावत जाऊन मागून त्याच्या कोटाची कॉलर जोरानं मागे ओढली. तो मद्यधुंद मागे ओढला गेला अन् वेगानं धावत येत असलेल्या पॅकार्डखाली चिरडून मृत्युमुखी पडण्यापासून वाचला.

त्याचं मरण टळलं. पॅकार्डचा ड्रायव्हर त्याला शिव्या देत पुढे निघून गेला. थोडा स्थिर झाल्यावर, वास्तवेचं भान आल्यावर शहारल्यासारखं वाटून तो म्हणाला, ''ओहऽऽ गॉड. मी सहज चिरडला गेलो असतो.''

त्यानं मला घट्ट आवळून धरलं होतं. असं वाटलं की त्याला सरळ उभा करून आपण इथून निसटावं. पण मी तसं करू शकलो नाही. कारण मला मार्गारिटचं स्मरण झालं अन् मनात विचार आला की, जर तिनं आपल्याला जळत्या इस्पितळात तसंच सोडून दिलं असतं तर? आपण याला वाचवलं, पण अशा अवस्थेत त्याला सोडून जाणं योग्य होणार नाही.

त्याची श्रीमंती दर्शवणारी वेशभूषा व त्याचं अस्तित्व; यातून मला हिरव्या कोऱ्या नोटांचा वास, नव्हे सुवास येतोय असं वाटलं. गरिबीच्या दारूण अवस्थेतून मी वाढत आल्यामुळे, आपण कुठल्याही मार्गानं खूप-खूप श्रीमंत व्हावं, हे माझं स्वप्न होतं.

तो दुसऱ्या दिशेकडे वळला पण चालताना त्याचा तोल जात होता. मी त्याला सावरलं. हाताचा आधार दिला. बुडत्यानं वाचवणाऱ्याकडे पाहावं तसा तो मला पाहू लागला. केविलवाण्या स्वरात म्हणाला,

''तू माझे प्राण वाचवलेस. तू मला मागे ओढलं नसतं तर मी मेलोच असतो. धन्यवाद हे शब्द अपुरे वाटतात मला.''

''तुम्ही कुठे निघाला होता?'' मी काळजीच्या स्वरात विचारलं.

''आपल्या घरी. पण मला माझी कार सापडत नाही, म्हणून शोधत होतो.''

''सापडेल. पण तुम्ही अशा अवस्थेत कार चालवत जाणार? थोडी कमी घ्यायला....''

''एऽऽ बाबा, मला उपदेश करू नकोस. तू मला जीवदान दिलं म्हणून ऐकून घेतोय. काय?''

''माफ करा. मी तुमच्या हिताचं बोललो. मला सांगा, तुम्ही कार शोधू शकाल?''

''नाही. आजवर मी मलाच शोधू शकलो नाही! हे तुला नाही कळणार. तू शोधून दे नाऽऽ माझी कार कन्व्हर्टीबल रोल्सराईस आहे, पिवळ्या अन् निळ्या रंगाची.'

मी रस्त्यापलीकडे उभ्या असलेल्या कार्सवरून नजर फिरवली. पण या मद्यपी गृहस्थाची कार त्यात नव्हती. मी त्याला विचारलं,

''कुठं पार्क केली होती?''

''बहुतेक मागच्या बाजूला. मला तिथपर्यंत घेऊन चल ना तू ऽऽ थोडे अजून उपकार कर.''

''उपकाराचा प्रश्न नाही. तुम्ही सुखरूप घरी पोचावे, अशी माझी इच्छा आहे.''

''बराच सज्जन दिसतोस. या फिल्म सिटीत लोक एकमेकांचे गळे कापतात. वाईटावर टपलेले असतात. अन् तू दुसऱ्याचे प्राण वाचवतोस. थीम चांगली आहे. काय? मी जास्त बडबड करतो का? अं? सांगना रे देवदूताऽऽ''

''तुम्ही मला कुणीकडून मागे जायचं ते सांगा. चलाऽ मी आधार देतो. व्हा पुढं.''

''मला आधारच हवा आहे! चल.''

त्याला सावरत मी मागल्या बाजूला गेलो. तिथं असंख्य गाड्या पाच रांगांमध्ये उभ्या होत्या. या रांगेतून त्या रांगेत, फिरता फिरता त्याची रोल्स एकदाची सापडली. ही कार अतिशय सुंदर अन् आरामशीर होती, म्हणजे आत बसणाऱ्याला सुखद अनुभव देणारी अशी. मला त्याचा हेवा वाटला.''

हा मद्यपी डगमगत ड्रायव्हिंग सीटवर बसला अन् म्हणाला,

''तूही चल माझ्या घरी. मला तुला बक्षीस...नाही कृतज्ञता माझ्यापरीनं ऽऽऽछेऽऽ म्हणजे धन्यवाद द्यायचे आहेत.''

''ते तर तुम्ही दिलेत. आता कशालाऽऽ?''

''आधी आत बैस.''

''मला यायला हरकत नाही. पण कार मी चालवीन. तुम्ही या अवस्थेत कार चालवू नये असं मला वाटतं. तुम्ही या सुंदर कारचा सत्यानाश करून ठेवाल. प्लीज.''

''ठीकायऽऽ मी मागे बसतो. तू चालव झालंऽऽ पण माझ्याबरोबर घरी चल.''

''ठीक. मी आत बसलो की, येणारच ना तुमच्याकडे!''

''व्हॉट अ जोक. थँक्यू.'' त्यानं आपला देह मागल्या सीटवर पसरवला.

''तू चालवशील ना नीट? ही कार मला खूप आवडते.'' मागला आवाज.

''मी कुठलीही कार चालवू शकतो. काळजी करू नका.''

''ठीकाय, चल आता.''

इंजिन सुरू करून मी कार पुढे काढली. स्टिअरिंग व्हील जवळ त्याचं ड्रायव्हिंग लायसन्स लटकत असलेलं मी पाहिलं. त्यावर नाव होतं, 'अर्ल डेस्टर, २५६ हिल क्रेस्ट अॅव्हेन्यू' म्हणजे हा हॉलिवूडच्या ख्यातनाम धनवंतांच्या कॉलनीत राहतो, हे माझ्या लक्षात आलं. शिवाय याचं निवासस्थान 'सबसेट बुलवर्ड' च्या डावीकडून दुसरं आहे, हे मी समजू शकलो.

हॉटेलच्या बाहेर पडायला जे महाद्वार होतं, ते दरबानानं उघडलं अन् मी सडकेवर कार आणली. माझ्या आता लक्षात आलं की आपण योग्य ठिकाणी जात आहोत.

डेस्टरचं डोकं नरम उशीसारख्या भागावर टेकताच त्याचा डोळा लागला. डेस्टरचा बंगला जवळ येताच मी कार थांबवली. गेटमननं गेट उघडलं. पुढे थोडा चढाचाचा वळणदार मार्ग होता. अंधारामुळे आसमंत स्पष्ट दिसत नसला तरी मार्गाच्या दोन्ही बाजूला झाडी असून दीड पुरूष उंचीची भिंत होती. मी सावकाश चढण चढून कार डेस्टरच्या भव्य वास्तूपुढे थांबवली.

डेस्टर खाली उतरला. गार वाऱ्यामुळे आता तो बराच सावरला होता. डेस्टरचा बंगला स्पॅनिश वास्तूसारखा वाटला. मेन गेटवर लोखंडी जाळीत दिवे लावलेले नव्हते, तरीही बंगल्याची निगा चांगल्याप्रकारे राखली आहे, हे माझ्या लक्षात आलं. मी स्टिअरिंग व्हीलवर हात ठेवून, आत पुढे काय होणार? याचं कल्पनाचित्र रंगवीत बसलो. डेस्टर कारमूधन व्यवस्थित उतरला नि ताठ उभा राहिला. थोडी झोप अन् गार वाऱ्यात त्याला बरंच सावरलं होतं. मी सुद्धा खाली उतरलो.

डेस्टर कारला टेकून उभा होता. मी कारला वळसा घालून त्याच्या समोर आलो.

''तुझं काय नाव सांगितलास मघा?'' डेस्टर.

''ग्लीश नॅश म्हणतात मला.''

''मी अर्ल डेस्टर. कदाचित माझं नाव ऐकलं असशील.'' मी काहीच बोललो नाही.

''मी माझ्या बायकोला जेव्हा सांगेन की, या नॅशनं माझे प्राण वाचवले अन् तू विधवा होण्यापासून बचावलीस! खूप मजा येईल मग.''असं म्हणून तो विचित्र